
१८५५०
म. ग्रं. सं. ठाणें
विषय [illegible]
सं. क्र. २५८

# इथे टेकले श्रीराम




REFBK-0011399



सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-मा ... पुष्प : २८.

# इथे टेकले श्रीराम

## रामटेकचा रामगिरी

२८३४० २८८ 22/11/60

आस्ते धर्मेश्वरो नित्यं स रामस्य गिराविह ।
पीडितं कलिना धर्मं यः कृपालुरपालयत् ॥

आ का शा न न्द
११३८८

किंमत
६५
नये पैसे

REFBK-0011399

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री९ २४१

© १९६०
वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रा. लि. मुंबई २.

*

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शनमाला : २७
...विदर्भ परिसर

*

आवृत्ति पहिली : १९६०

*

किंमत ६५ नये पैसे

*

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भाव-रम्य बोलकीं शब्दचित्रें

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :
ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

# विदर्भाचें संस्कृति-वैभव

महाराष्ट्राच्या घटकप्रदेशांतील विदर्भ-भूमि अत्यंत प्राचीन आहे. उपनिषत्कालापासून विदर्भाचे गौरवोल्लेख आढळतात. नर्मदा आणि कृष्णा या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत विदर्भानें प्राचीन काळीं आपला सांस्कृतिक प्रभाव पाडला होता. महर्षि अगस्त्यांच्या तपस्तेजानें उजळून निघालेली लोपामुद्रा, भगवान् श्रीकृष्णाचें हृदय जिंकणारी रुक्मिणी आणि पुण्यश्लोक नलराजासाठीं वनवास पत्करणारी दमयन्ती या विदर्भभूमीच्याच कन्या.

इतिहास-काळांत सातवाहन, वाकाटक, कलचूरी, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या सर्व प्रसिद्ध राजकुलांनीं विदर्भाची गौरवशाली परंपरा वर्धिष्णु बनविली. वाकाटकांच्या काळांत तर विदर्भभूमि संस्कृति-वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. गुप्तवाकाटकांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें—त्या वाकाटकांची राजधानी विदर्भांत नंदिवर्धन (नगरधन) येथें होती. राज्य-कर्तृत्व, धर्म, साहित्य आणि कला या संस्कृतीच्या सर्व अंगांचें विदर्भानें पोषण केलें आहे.

'वैदर्भी रीति' विदर्भाच्या मातींतूनच फुललेली आहे. महाकवि भवभूति हा विदर्भाचाच पुत्र. महानुभावपंथसंस्थापक चक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ, आदिकवि मुकुंदराज, द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती हे मूळचे विदर्भांतीलच.

—श्रीरामाच्या पाऊलखुणा उरीं सांठविणारें रामटेक, रुक्मिणी-स्वयंवराच्या मधुर स्मृतींत रंगणारी अमरावती, जैनांच्या परंपरेची जपणूक करणारा मुक्तागिरि, महाकालीची उपासना करणारें चंद्रपूर, श्रीगणेशाच्या आराधनेंत मग्न असणारीं आधाशा आणि कळंब हीं स्थानें, विदर्भपंढरी कौंडिण्यपूर आणि आधुनिक सन्त श्रीगजाननमहाराज यांचें शेगांव या विदर्भांतील कांहीं संस्कृति-केंद्रांचा परिचय या मालेंतून करून दिला जात आहे.


# इथे टेकले श्रीराम–

## रा म टे क चा रा म गि रि

‘ रामक्षेत्रीं रामलक्ष्मण गडावरी आहे ।
हजारों प्राणी जाती दर्शना भावें वंदिती पाहे ॥ ’

आपल्या भारतभूमीवर अनेक तीर्थक्षेत्रें विखुरलेलीं आहेत. त्यांपैकीं रामटेक हें देशाच्या हृदयस्थानीं विराजमान झालेलें आहे. वनवासकाळांत दक्षिणेकडे जातांना श्रीराम प्रभु या स्थळीं विश्रांतीस्तव टेकले होते म्हणून याचें नांव रामटेक. घोर तप आचरणाऱ्या शम्बूक नामक शूद्र राजाचा वध करण्यासाठीं रामचंद्र या टेकडीवर आले होते असा पद्मपुराणांत उल्लेख आहे.

त्या सर्वदा स्मरणीय अशा श्रीरामप्रभूच्या पवित्र पादस्पर्शानें पुनीत झालेला असा ह्या पावन गिरि आहे : रामटेकचा रामगिरि !




रामटेकचा रामगिरी

**रामटेकचा भूगोल आणि इतिहास :**

रामटेक हें शहर विदर्भांत नागपूर जिल्ह्यांत आहे. नागपूर जिल्ह्याच्या तहसिली एकूण पांच–नागपूर, उमरेड, रामटेक, सावनेर आणि काटोल. रामटेक या तहसिलीचें स्थान असें आहे–उत्तरेस छिंदवाडा जिल्हा, पूर्वेस भंडारा जिल्हा, दक्षिणेस उमरेड तहसील आणि पश्चिमेस नागपूर व सावनेर ह्या तहसिली. हिचा आकार साधारणत: त्रिकोणासारखा असून ही तहसील दक्षिणोत्तर ४५ मैल लांब आणि पूर्वपश्चिम ३८ मैल रुंद आहे. हिच्यांत ३७७ गांवें आहेत. १९५१ च्या शिरगणतीनुसार या तहसिलीची लोकसंख्या १ लक्ष ४६ हजार ९५८ आहे. हिच्यांत उत्तरभागीं सातपुडा पर्वताचे फाटे आणि रामटेकजवळ अंबागडचे डोंगर आहेत. या तहसिलीच्या मध्यभागांतून पेंच, सांड व सूर; उत्तर भागांतून तुंडिया आणि दक्षिण सरहद्दीवरून कन्हान ह्या मुख्य नद्या वाहतात. अंबाळा, मनसळ, कांद्री, चाकुर्डा आणि रामसागर हे तलाव प्रमुख आहेत. या तहसिलीच्या उत्तर भागांत टेकड्या आणि डोंगर जास्त असल्यामुळें तो प्रदेश डोंगराळ व जंगली आहे; पण दक्षिण भाग नद्यांच्या गाळामुळें सपाट व सुपीक बनला आहे.

रामटेक या नांवावरूनच या नगरीचा इतिहास रामावतारापासूनचा पुरातन आहे आणि तिला धार्मिक महत्त्वहि फार प्राचीन काळापासून प्राप्त झालें असावें हें स्पष्ट होतें. रामावतारकालापूर्वी नारसिंहावतार कालांत देखील या स्थळास महत्त्व होतें. रामटेक नगरीला लागून असलेल्या डोंगरावर त्या काळीं जुलमी दैत्य राजा हिरण्यकश्यपूचें राज्य होतें. त्याचा पुत्र भक्त प्रल्हाद याच्या साहाय्यार्थ भगवान् विष्णूंनीं चवथा अवतार धारण केला. नारसिंहानें हिरण्यकश्यपूचा वध केला. त्याच्या रुधिरानें डोंगर लाल झाला म्हणून पुढें त्याला सिंदुरगिरि असें नांव पडलें. महाकवि कालिदासाच्या 'मेघदूत' नामक महाकाव्यानें येथेंच जन्म घेतला. सरकारतर्फें कालिदासाचें

स्मारक रामगिरीवर लवकरच उभारण्यांत येणार आहे. टेकडी-वरील राममंदिराच्या कळसावर अजूनहि नीलज्योतिदर्शन होत असतें. आकाशांतील विद्युत् कधींकधीं श्रीराममूर्तीला प्रदक्षिणा घालून जाते असें भाविक म्हणतात. रामटेकच्या निकट डोंगराच्या रांगा आहेत. त्यांपैकीं रामगिरि किंवा रामटेकची टेकडी आणि अंबागडचे डोंगर प्रमुख होत. राम-गिरीवरच रामचंद्राचें सुप्रसिद्ध देवालय आहे. येथील डोंगरी प्रदेशांत ऋषिमहर्षींना आणि संतमहंतांना जपतप ध्यानधारणा करण्यास योग्य अशीं अनेक स्थळें आहेत. रामटेकच्या परिसरांत शिरल्यावर कोठूनहि कोणीकडेहि दृष्टि टाकली तरी निसर्गसौंदर्यानें मन मोहून गेल्याशिवाय रहात नाहीं. रामटेकला काशीयात्रेचें महाद्वार म्हणतात.



रामटेक : मंदिरसमूह

पुण्यक्षेत्र म्हणून रामटेकची ख्याति फार पूर्वीपासून असली तरी रामगिरीचा ऐतिहासिक वृत्तांत बरींच वर्षें उपलब्ध नव्हता. नागपूरचे महामहोपाध्याय प्राचार्य डॉ. वा. वि. मिराशी यांनीं संशोधन करून तो प्रकाशांत आणला. विदर्भ संशोधन मंडळा-तर्फे प्रकाशित झालेलें ‘ मेघदूतांतील रामगिरि अर्थात रामटेक ’ हें त्यांचें पुस्तक म्हणजे रामटेकबद्दलची अधिकृत माहिती होय. प्रस्तुत पुस्तकांत त्यांनीं दिलेल्या रामगिरीच्या इतिहासाचा सारांश असा :

रामटेकची ही टेकडी ' रामगिरि ' या नांवानें निदान दीड हजार वर्षें सुप्रसिद्ध आहे. हिची उंची सुमारें ५०० फूट आहे. अतिप्राचीन काळीं, वाकाटकांच्या कारकीर्दींत गडावर रामचंद्रांच्या पादुकांचें पूजन होई. वाकाटक राज्ञी प्रभावती गुप्त हिचा अमरावती जिल्ह्यांतील ऋद्धपूर गांवीं सांपडलेला ताम्रपट 'रामगिरिस्वामिनः पादमूलात्' म्हणजे रामगिरीवरील भगवान् रामचंद्राच्या पादुकांजवळ दिला होता. तिच्या दुसऱ्या ताम्रपटांत तसेंच तिचा पुत्र द्वितीय प्रवरसेन याच्याहि कांहीं ताम्रपटांत ' भगवत्पादमूलां ' चा उल्लेख आहे. तोहि रामगिरी-वरच्याच पादुकांना उद्देशून असावा. कालिदासाच्या मेघदूतांतील निर्वासित यक्ष रामगिरीच्या आश्रमांत रहात होता. त्या काव्यांत रामगिरीचें वर्णन ' वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु ' (भगवान रामचंद्राच्या पूज्य पादुकांनीं अंकित झालेला) असें केलें आहे. नंतरच्या काळांत तेथें राम, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ति स्थापण्यांत आल्या असें दिसतें. औरंगजेबाच्या काळांत मूर्ति भग्न होण्याचा संभव उत्पन्न झाल्यामुळें त्या सूर नदींत (किंवा दुधाळें तळ्यांत) लपविल्या होत्या. नागपूर राज्याचे संस्थापक पहिले रघूजी राजे यांनीं इ. स. १७३६ च्या सुमारास भेट दिली तेव्हां देवळांत मूर्ति नव्हत्या असें दिसतें. त्यावेळीं ते देवगडावर स्वारी करण्याच्या उद्योगांत होते. त्यांनीं नवस केला कीं, आपणांस जय मिळाल्यास आपण गडावर भगवान् रामचंद्राची स्थापना करूं. पुढें त्या स्वारींत यश प्राप्त झाल्यावर त्यांनीं जयपुराहून संगमरवरी मूर्ति आणविल्या. पण त्यांस दृष्टांत झाला कीं, त्या मूर्ति न स्थापतां सूर नदींतील प्राचीन मूर्तींचीच स्थापना करावी. त्याप्रमाणें रघूजींनीं फसली सन ११६३ (इ. स. १७५३) मध्यें त्या मूर्तींची स्थापना केली. गडावर लक्ष्मणाच्या देवळांत रामदेवराव यादवाच्या काळचा ख्रिस्तोत्तर तेराव्या शतकांतील कोरीव लेख आहे. या शिलालेखामुळें राम-टेकच्या इतिहासाचें संशोधनकार्य वरेंच सुलभ झालें.

## रामटेकच्या रामगिरीकडे :

रामटेकला जावयाचें म्हणजे आधीं नागपूरला येणें प्राप्त आहे. नागपूर ते रामटेक हें अंतर मोटारनें २९ मैल आहे. नागपूर रेल्वे स्टेशन जवळ असलेल्या प्रॉव्हिन्शियल ट्रान्स-पोर्टच्या बसेस रामटेकला जाण्यासाठीं सकाळीं ९-३०, ११, दुपारीं १२-३०, २, ४ आणि सायंकाळीं ७-३० ला सुटतात. बस सुटण्याच्या अर्धा तास आधींपासून तिकिटें मिळूं लागतात. आदले दिवशीं रिझर्व्हेशनहि होऊं शकतें. तिकीट दर माणशीं रु. १–४५ न. पैसे आहे. मार्ग रुक्ष आहे. दुतर्फा बाभळीचीं बनें आणि संत्र्यांच्या बागा दृष्टीस पडतात. कामठी आणि कन्हान हीं गांवें, कन्हान नदीचें विशाल पात्र आणि नागपूर नभो-वाणीच्या ट्रान्समीटरचा उंच स्तम्भ एवढींच काय तीं आकर्षणें मार्गांत आहेत. रामटेकच्या परिसरांत आपण शिरलों कीं मग मात्र वातावरणाचा कायापालट झाल्यासारखा वाटतो. उंच रामगिरि, शिंदीचीं झाडें आणि मँगनीजच्या खाणी यांचें दर्शन मनाला सुप्रसन्न करतें. नागपूर ते रामटेक हें अंतर क्रमण करण्यास बसला दीड तासांचा अवधि पुरेसा होतो.

गाडीनें नागपूर ते रामटेक हें अंतर २६ मैल आहे. तिकीट दर ७२ नये पैसे. वेळ तितकाच म्हणजे १॥ तास लागतो. रामटेक लोकल सकाळीं ५। आणि सायंकाळीं ६ वाजतां नागपूरहून सुटते आणि रामटेकला पोचून लगेच परतहि येते. वेळेच्या दृष्टीनें ही लोकल सोयीची असली तरी रामटेक रेल्वे स्टेशन हें शहरापासून २ मैलांवर आहे त्यामुळें बसेसच परव-डतात. बस स्टँड शहरांत मध्यभागीं आहे. बसनें नागपूरला परत जाण्याच्या वेळा अशा आहेत : सकाळीं ८, १०–३०, ११–३०, दुपारीं १-३०, ३, ४-४५ आणि सायंकाळीं ६ व ७ वाजतां. रामनवमी आणि कार्तिकी पौर्णिमेला भरणाऱ्या यात्रां-निमित्त जादा बसेस आणि लोकल गाड्या नागपूरहून सुटतात.

बसमधून आपण उतरलों कीं शहरांतच आलेलों असतों. उतरण्यासाठीं सोयीची धर्मशाळा केवळ एकच आहे. तिचें नांव 'श्रीक्षेत्र रामटेक तेली समाज धर्मशाळा.' ही अंबाळा तलावाजवळ स्थित आहे. पंचवीस वर्षांपूर्वीं येथें येणाऱ्या यात्रेकरूंच्या राहण्याची व स्वयंपाकाची कोणतीहि सोय सेवामय दृष्टिकोनांतून उपलब्ध नव्हती. या गैरसोयीची जाणीव संत नेरलेकर महाराज यांना झाली. धर्मशाळेची निकड लोकांना पटली पण या कामीं कोणी पुढाकार घेईना. तेव्हा संत नेरलेकर महाराजांनीं आमरण उपोषणाचा संकल्प जाहीर केला. अखेर प्रयत्नांना यश येऊन दिनांक २१-११-१९३४ ला धर्मशाळेच्या जागेचें भूमिपूजन झालें. १३ वर्षेपर्यंत ही धर्मशाळा फक्त तेली बांधवांसाठीं खुली होती; पण देवाच्या दरबारांत असा भेदभाव करणें अन्यायाचें आहे हें कार्यकर्त्यांनीं ओळखलें आणि दिनांक २८-११-१९४७ ला धर्मशाळा सर्व जातींच्या यात्रेकरूंकरिता खुली केली. तेव्हांपासून ती यात्रेकरूंच्या आश्रयाचें प्रमुख स्थान होऊन बसली आहे. हिच्याशिवाय आणखी दोन धर्मशाळा आहेत. एक रामटेक रेल्वे स्टेशनजवळ आणि दुसरी गांवांत आहे. हौशी प्रवाशांना मार्गदर्शन करणारी किंवा वाटाडे पुरविणारी संस्था आजवर येथें नव्हती. पण येथील एक उत्साही समाज कार्यकर्ते श्री. दत्तात्रय जागेश्वर पारखी यांच्या दीर्घ प्रयत्नांमुळें तीहि सोय आतां झाली आहे.

बसच्या किंवा रेल्वेच्या स्थानकापासून धर्मशाळेपर्यंतचा मार्ग क्रमण करीत असतां आजच्या रामटेकचा परिचय आपल्याला होईल. या शहराची लोकवस्ती सुमारें साडेनऊ हजार. एकंदरींत गांव सुखवस्तु असून लोक सेवातत्पर आहेत अशी आपली धारणा होते. निवासस्थानीं स्नान, भोजन आणि आवश्यक तेवढा विश्राम घेतल्यावर रामगिरीची चढण आक्रमूं लागण्यास हरकत नाहीं.


## टेकडीवरील देव-देवालयें :

गडावर जाण्यासाठीं अनेक मार्ग आहेत. त्यापैकीं तीन प्रमुख आहेत. मुख्य मार्ग, धूम्रेश्वर मार्ग आणि अंबाळा मार्ग. यांपैकीं अंबाळ्याकडून टेकडीवर जाणारा मार्ग लांबीनें अधिक असला तरी चढायला सोपा आहे. याच मार्गानें वर जाणें सोयीचें असतें. पण कांहींच्या मतें धूम्रेश्वर मार्ग अधिक श्रेयस्कर. अर्थात् यामागें थोड्या धार्मिक भावना आहेत. रामटेकला आल्यानंतर प्रथम धूम्रेश्वराचें दर्शन घेतल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याहि देवाच्या दारीं जाऊं नये असें म्हणतात. 'सिंदुरागिरि महात्म्यां'त या संबंधींची कथा आली आहे.

### धूम्रेश्वर

रामायणकाळीं धूम्रेश्वर या पर्वतावर शम्बूक नांवाचा शूद्र राजा उग्र तपश्चर्या करीत होता. त्यानें आपले पाय एका वृक्षाला टांगले होते आणि डोकें खालीं करून तो धूर प्राशन करीत असे. वृक्षाच्या तळाशीं एक कुंड होतें त्यांत बिल्वपत्रांचें हवन झाल्यानें त्यांचा धूर होई. शम्बूक डोळे मिटीत नसे. त्याकाळीं शूद्राला अशी तपश्चर्या करण्याचा अधिकार नव्हता. त्यामुळें रामराज्यांत अधर्म घडला. पंथा नांवाच्या एका ब्राह्मणाचें मूल अकालीं मेलें. अधर्माचें मूळ शोधण्यासाठीं रामचंद्र निघाले. त्यांना रामगिरीवर तपश्चर्या करीत असलेला शम्बूक दिसला. त्यांनीं चंद्रहास नामक खड्गानें त्याचा वध केला. शम्बूक दिव्यगतीस पोहोंचला. त्यानें रामापाशीं तीन वर मागितले. १. आपण सदैव या पर्वतावरच रहावें. २. माझा देह शिवलिंग-रूप व्हावा. ३. या पर्वतावर येणाऱ्या यात्रेकरूंनीं आधीं माझें दर्शन घ्यावें; तसें न केल्यास त्यांची मनोकामना पूर्ण होऊं नये. प्रभु रामचंद्रानें तपस्वी शम्बूकाला हे तीन्ही वर दिले. या गिरीवर शम्बूक तप करीत होता म्हणून त्यास तपोगिरि असेंहि

नांव प्राप्त झालें होतें. टेकडीवर शम्बूक उर्फ धूम्रेश्वराचें स्थान आजहि पहावयास मिळतें. तेथे शिवलिंग असून तें लोकांचें आद्य श्रद्धास्थान ठरूं पहात आहे.



धूम्रेश्वर

## कपटराम

धूम्रेश्वराला जातांना वाटेंत कपटरामाचें देऊळ लागतें. यालाच पूर्वी गुप्तराम म्हणत असा समज आहे. महानुभावांच्या स्थानपोथींत या गुप्तरामाचा उल्लेख आहे 'गुप्तरामाचें दर्शन मनोभावानें घेतल्यावर जें पद प्राप्त होतें तें इन्द्रालाहि लाभत नाहीं' असा त्याचा महिमा लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत वर्णिलेला आहे.

असो. धूम्रेश्वराची थोडीशी नाराजी पत्करण्यास हरकत नाहीं असें ठरलें असल्यास अंबाळ्याकडून जाणाऱ्या मार्गानें चढूं लागूं या. शहरांतून अंबाळ्याकडे जातांना आधीं उजव्या हातास विशाल मैदान लागतें. ही यात्रेची जागा. नंतर उंच प्रवेशद्वार ओलांडलें कीं उजवीकडे अंबाळ्याचें पाणी चकाकतें. सदासर्वकाळ चालू राहणारीं क्रियाकर्में दृष्टीला पडतात. आणखी पुढें गेलें कीं डावीकडे दिसते ती पूर्वोल्लेखित धर्मशाळा. नंतर उजवीकडे राधाकृष्णमंदिर, प्रेमकुटी आणि वैष्णवी देवस्थान. वेळ असल्यास मंदिरांतून जाऊन येण्यास हरकत नाहीं. आतां दमडी पायऱ्या लागणार. या नवसाच्या आहेत म्हणतात,

हें आणखी एक प्रवेशद्वार; याचें नांव विक्रमदरवाजा. आतां चढण जाणवूं लागते. टेकडीवरचे दगड तांबूस आहेत. पायऱ्याहि त्याच रंगाच्या. कदाचित या टेकडीला पूर्वीं सिंदुरगिरि म्हणत तें याच कारणामुळें. कांहीं पायऱ्या जवळ जवळ आहेत तर कांहीं दूर दूर आहेत. दुतर्फा झाडें आहेत. डावीकडून बारीकशी पायवाटहि आहे. पायऱ्यांवर तेलकट पिवळे डाग दिसतात. हा वानरांचा प्रताप. रामदूतांनीं केलेल्या विसर्जनांचे ते डाग. त्यांची आपली भेट प्रत्यहीं होतेच आहे. डावीकडचें दत्तमंदिर आपण पाहिलें अन् थोडे पुढें गेलों कीं ती उजवीकडे दिसते सेंदूरबावली.

## सेंदूरबावली

हिला सिंदुरवापी असेंहि नांव असून स्थानपोथींत हिला सिंदुर्वावी म्हटलें आहे. गडावर असलेल्या दोन प्रमुख बावल्यांपैकीं ही एक असून हिचें पाणी पिण्याकरितां आणि पूजेसाठीं नेतात. नरसिंहानें हिरण्यकश्यपूला मारल्यानंतर आपल्या हातांतील शस्त्र (त्याचें नांव मुद्गर) भूमीवर फेकलें. तें ज्या ठिकाणीं पडलें तेथें खळगा पडून त्यांत पाणी आलें. त्याला ‘मुद्गर वापी तीर्थ’ असें नांव प्राप्त झालें. हेंच मुद्गर तीर्थ सध्यां सेंदूरबावली या नांवानें प्रसिद्ध आहे. लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत हिचा उल्लेख असा आहे :

**श्रीरामचंद्रस्य समीपतो हि सिंदूरवापी सुकृतप्रपा सा ।**
**यस्या विशुद्धेन विलोकनेन विजित्य नाकं समुपैति मुक्तिम् ॥**

आपण सेंदूरबावलीजवळ आहोंत तोंच कोणीतरी उत्तरेकडच्या टेकडीच्या दिशेनें बोट दाखवून म्हणेल–‘ तें पहा तें बहीण-भावाचें देऊळ. ’ आणि तो गोष्ट सांगू लागेल :

## भग्न त्रिविक्रम

‘ फार फार वर्षांपूर्वींची गोष्ट. एक होती बहीण आणि तिला होता आवडता वडील भाऊ. एकदां बहिणीकडून कांहीं

अपराध घडला. भाऊ चिडला. त्यानें त्वेषानें लाथ मारली. बहीण साध्वी होती. तिला लाथ मारण्याचें पाप भावाकडून घडल्यामुळें त्याच्या पायांत किडे पडले. बहिणीचा स्वभाव सोशीक अन् मन मोठें होतें. तिनें शांतपणें भावाच्या पायांतील किडे उपसण्यास आरंभ केला. भावाला पश्चात्ताप झाला. त्यानें बहिणीची क्षमा मागितली.'

ही लोककथा ज्या मूर्तीसंबंधीं सांगण्यांत येते ती मूर्ति वास्तविक भगवान् विष्णूच्या पांचव्या अवताराची आहे, त्रिविक्रमाची आहे. वामनाची ही मूर्ति चतुर्भुज असून तिचे चारी हात भग्न झाले आहेत. शिरावर मुकुट, कानांत कुंडलें आणि गळयांत मुक्ताहार आहे. वामनाच्या शिल्पांत खालच्या बाजूला बळिराजा कोरलेला आहे. त्रिविक्रमाचा डावा पाय भूमीवर रोवलेला असून बळीच्या मस्तकावर ठेवला जाणारा त्याचा उजवा पाय गुडघ्यांतूनच भंगला आहे. पूर्वी बळीच्या राणीची मूर्तिहि असावी. ती आतां स्पष्ट दिसत नाहीं. या भग्न मूर्तीचे कपचे सोन्याचांदीच्या पात्रांना उजळा देण्यासाठीं लोक पळवितात असेंहि कळतें.



भग्न त्रिविक्रम

त्रिविक्रमाच्या भग्न मूर्तीसमोर छोटासा सहा खांबी मंडप दिसतो. पूर्वीचें कलात्मक, सुंदर, विशाल देवालय नष्ट झालें आहे. मंडपाच्या चार स्तंभांवर पद्मबंधाचें कोरीव काम आढळतें. मंडपांत सध्यां मूर्ति नाहीं. हें देवालय प्राचीनतम म्हणजे गुप्त वाकाटक काळांतलें आहे असें मत आहे.

त्रिविक्रम म्हणजे गडावरील प्रमुख आकर्षण होय. येथून भव्य रामसागर तलावाचा सुंदर देखावा दिसतो. राममंदिराच्या पूर्वेस दोन फर्लांगावर असलेली त्रिविक्रमाची मूर्ति सेंदूरबावली-पासून फारशी दूर नाहीं.

## नरसिंह

सेंदूरबावलीच्या दक्षिणेस म्हणजे आपल्या मार्गाच्या डाव्या बाजूस नरसिंहाचीं दोन देवळें आहेत. तीं पाहिलींच पाहिजेत. छोटा नरसिंह आणि मोठा नरसिंह अशीं त्यांचीं नांवें आहेत. मोठा नरसिंह तर खूपच भव्य आहे. अंगावर शेंदराचा जाड थर आहे. उंची निदान ९ फूट आहे. आपल्या 'तीर्थरूप महा-राष्ट्रां'त पं. महादेवशास्त्री जोशी या नरसिंहाबद्दल लिहितात— " पाठमोरे पाहिल्यावर त्यांच्या आयाळीची खरी कल्पना येते. एखाद्या कमकुवत मनाच्या माणसानें त्याला पाहिलें तर तो स्वप्नांत प्रकटून त्याला निजल्याजागीं घामाघूम करील. "

काय थकलांत ना ? ... थोडा दम घ्या. आलोंच आपण विश्रांतीच्या स्थळीं. आपल्या डावीकडे आणि समोरहि मिठाईचीं दुकानें आहेत. लांकडी बाकावर बसून आपल्याला श्रमपरिहार करतां येईल. नारळ, उदबत्ती, फुलें, हार आणि प्रसाद हें साहित्य या दुकानांतून मिळू शकेल. आपल्याला तहान लागलेली असणार. चहा, दूध, निदान पाणी तरी प्यायला हरकत नाहीं. चला, उठा आतां. उजवीकडच्या द्वारां-तून आंत प्रवेश करा. गडाच्या आंतल्या तटबंदीचा हा दरवाजा. याचें नांव वराह दरवाजा. अलीकडे एक मशीद आहे. आणि आंत गेलों कीं उजव्या हाताला वराहाचें मंदिर आहे.

## वराहमूर्ति

वराह म्हणजे दशावतारांतील क्रमांक तीनचा अवतार. त्याची ४ फूट उंचीची धष्टपुष्ट मूर्ति या मंदिरांत आहे. मूर्ति चतुष्पाद असून अंगावर देवादिकांच्या आकृती नाहींत. वराह

हें राष्ट्रकूटांचें प्रतीक होतें. तैत्तिरिय संहितेंत अशी गोष्ट आहे कीं, 'आपलें विश्व आरंभीं जलरूप होतें. प्रजापति वायुरूप स्वीकारून जलावर तरंगला. त्याला पाण्याच्या तळाशीं पृथ्वी दिसली. तेव्हां त्यानें तात्काल वराहरूप धारण करून तिला वर काढलें.' वराहाबद्दल अशा अनेक कथा आहेत. या मूर्तीच्या दर्शनार्थ आलेला प्रत्येकजण त्याच्या पोटाखालून सरपटत दुसऱ्या अंगाला जातो. ज्याला आरपार जातां येत नाहीं तो पापी अशी येथें समजूत आहे. तुंदिलतनु लोकांची मात्र येथें घाबरगुंडी उडते.



वराहमंदिर

## भोगराम


वराहाचें दर्शन घेऊन आपण आणखी पुढें आलों आहोंत. हें डावीकडचें मंदिर भोगरामाचें. या मंदिरांत आज राममूर्ति नाहीं. आंत भगवान् विष्णु विराजमान झालेले आढळतात. तें उजवीकडचें देऊळ देवीचें आहे. मूर्ति भग्न आहे. भोगराम आणि देवी या दोन देवळांमध्यें जी मोकळी जागा दिसते ती अत्यंत पावन आहे. येथें महानुभावांची मोठी यात्रा भरते. या पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर यांचा मुक्काम येथें दहा महिने होता असें स्थानपोथी सांगते : 'भोगरामीं अवस्थान मास १० :' तेराव्या शतकांत श्रीचक्रधर यात्रा करीत करीत रामटेकला आले होते असें लीळाचरित्रावरून समजतें. 'श्री भोगरामाचें सुंदर रूप पाहिल्यावर मनुष्याचीं सर्व पातकें नष्ट होऊन तो

साक्षात् इन्द्रापेक्षांहि अधिक अशा विविध प्रकारच्या चिरकाल टिकणाऱ्या भोगांचा अनुभव शेकडों कल्पांपर्यंत विष्णुलोकांत घेत असतो ’ या आशयाचें वर्णन लक्ष्मणाच्या देवळांतील शिलालेखांत आलें आहे.

११३ee संदर्भ शाखा

## नगारखाना

आतां सिहपूर दरवाजांतून आपण आंत जाऊं. हा भाग प्राचीन आहे याची साक्ष आपल्याला पटते. येथेंच भोसल्यांचें दारुगोळा ठेवण्याचें कोठार होतें. तोफखानाहि होता. हा मोठा चौक ओलांडून आणखी पुढें गेलों कीं भैरव दरवाजा लागतो. भैरवाचें दर्शन घेऊन डावीकडे पाहूं या. हा नगारखाना. अरुंद पायऱ्या चढून वर जातां येईल. नगारखान्यांत ४ नगारे आढळतात. त्यांपैकीं ३ सुस्थितींत असून चौथा म्हणजे सर्वांत मोठा आणि जुना फुटला आहे. त्याचा व्यास निदान ४½ फूट तरी असावा. या मोठ्या नगाऱ्यावर कांहीं मजकूर कोरलेला दिसतो. तो वाचतां येईल :




भैरव दरवाजा

> ‘ गडीरामजी व : तानबाजी घोगरे मालगुजार मौ : राजेगाव तहसील व जिल्हा छिंदवाडा यांनी हा नगारा रामचंद्राचे देवळांत अर्पण केला सन १३१३. ’

नगारखान्यावर ४०० व्होल्टस्‌चा मर्क्युरी लँप आहे. त्याचा

उजेड रामटेक गांवांतून दिसतो. १९५४ सालीं पुन्या गडावर प्रसिद्ध उद्योगपति शामजी नारायणजी यांच्या भगिनीनें वीज आणली.

नगारखान्याच्या खालीं विशाल चौक आहे. वानरांचे समूह येथें आढळतात. उजवीकडे मंदिराच्या सेवकांचीं निवासस्थानें आहेत. नगारखान्याला लागूनच राधाकृष्णांचें देऊळ आहे. येथें स्वामी बन्सीदास महाराजांचें वास्तव्य असतें. हा चौक ओलांडला कीं आपण गोकुळ दरवाजापाशीं येऊन पोहोंचतों.



गोकुळद्वार (मुख्य प्रवेशद्वार)

डावी कडे सध्यां ज्याला दशरथ-वसिष्ठाचें देऊळ म्हणतात तें आहे. यांत हरिहरांच्या मूर्ति आहेत. भिंतीवर एक मोठा सूचनाफलक आहे. त्याअन्वयें हिंदुव्यतिरिक्त इतरांना गोकुळद्वारांतून मुख्य चौकांत जाण्याची सक्त मनाई आहे. या द्वारांतून प्रवेश करण्यापूर्वी आपलीं पादत्राणें काढून ठेवावीं लागतात. या चौकांत सर्व प्रमुख देवळें आहेत. समोरच डावीकडे श्रीगणपतीचें देऊळ आहे. 'प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् । भक्तावासं स्मरेन्नित्यमायुः-कामार्थसिद्धये ।।' गणपतीच्या समोरच्या ओटयावर कबीर-पंथाचे लोक आपला हक्क सांगतात. उजवीकडे गंगामाईचें देवालय आहे. नंतर मारुति. या हनुमानमंदिरांत बलभीमाची मोठी मूर्ति आहे. रामलक्ष्मणांचें दर्शन घेण्यापूर्वी प्रथम रामदूताची आज्ञा घेणें भाग आहे. आतां लक्ष्मणाचें मंदिर.

## लक्ष्मणमंदिर

याच मंदिरांत यादव नृपति रामचंद्राचा तो प्रसिद्ध शिलालेख गाभाऱ्याच्या द्वाराशेजारीं उजवीकडील भिंतीवर आहे. देवळाच्या बाहेरील दरवाजे पितळेनें आणि गाभाऱ्याचें द्वार चांदीनें मढविलें आहे. लक्ष्मणाची मूर्ति वनवासी वेशांत आढळते. हें देऊळ रामसीता यांच्या देवळासमोर आहे. एकाच देवळांत राम-लक्ष्मण-सीता यांच्या मूर्ति नाहींत. मंदिरांतील शिलालेखाचें वाचन डॉ. मिराशी यांनीं केलें आहे. त्यांच्या शब्दांत या शिलालेखाचा थोडक्यांत परिचय असा करून देतां येईल :

'आरंभीं हा लेख फार मोठा असावा. सध्यां त्याच्या ७५ ओळी दिसतात. त्यांनीं २ फूट ६ इंच रुंद आणि ३ फूट १ इंच उंच इतकी जागा व्यापली आहे. या लेखाचे दोन भाग पडतात. पहिल्या भागांत एका राजवंशाचें व त्यांतील पुरुषांनीं केलेल्या पराक्रमाचें वर्णन केलें होतें. पण हा भाग खराब झाल्यानें त्यांतील ऐतिहासिक माहिती नष्टप्राय झाली आहे. लेखाची लिपी इ. स. बाराव्या तेराव्या शतकांतील नागरी आहे.'

लक्ष्मणाच्या मंदिरांत रोज सकाळ सायंकाळ एक विशिष्ट आरती होते. या आरतीची रचना खूपच रेखीव आणि अर्थपूर्ण आहे. तिच्या पंक्तींतहि रामगिरीवर (सिंदुरगिरीवर) लक्ष्मण हा रामसीता यांच्या समोर असल्याचा उल्लेख आहे. ही आरती अशी :

जयदेव जयदेव जय सौमित्रा
कुलदीपक तुज पाहुनी झालें सुख मित्रा ॥ धृ ॥
अनुपम गौरव तनु सुंदर अति काया
समरीं वधिला रावण बलिया अतिकाया
येतां दानव पुढती सावध जिंकाया
असती सिंदुराग्री अग्रणी काया ॥ १ ॥

सिंदुराग्री मांडुनीया अग्रणीं स्थान
असस़ी अग्रज पाठीमागें घालून
सावध सायुध करीं घेऊनिया धनुबाण
सीताराम पदांबुजीं ठेवुनिया ध्यान ॥ २ ॥
अग्रज पदनमनासी त्रैकालीं गमना
करशी कर करूनिया शुद्धाचरणा
रामीं लक्ष म्हणूनिया म्हणविसी लक्ष्मण
भावें अंकीं दास करीतसे नमन ॥ ३ ॥

लक्ष्मणाचा निरोप घेऊन रामरायाच्या दर्शनाला जाऊं या

## राममंदिर

या मंदिरांत राम आणि सीता यांच्या काळचा पाषाणाच्या, वनवासी वेशांतील सुंदर मूर्ति आहेत. आपण आणलेला पुष्पहार आणि प्रसाद येथें सम ण करावा. पुजारी तीर्थप्रसाद देतो. राममंदिराला विस्तीर्ण प्राकार असून चारी दिशांना द्वारें आहेत. मंदिराच्या रचनेवर बौद्ध शिल्पाची छाया दिसून येते. राम आणि लक्ष्मण या दोन्ही मंदिरांतील मूर्ति स्थानिक दुधाळें नामक तलावांत सांपडल्या. त्यांची स्थापना इ. स. १७५३ मध्यें पहिल्या रघूजी राजांनीं केली. बंगालच्या स्वारीनंतर रघूजींनीं जडजवाहिरांचे बरेचसे दागिने देवाला अर्पण केले. या वेळेपासूनच मंदिराची व्यवस्था भोसल्यांनीं आपल्याकडे घेतली. पुढें भोसले राजांनीं देवस्थान-व्यवस्थेकरितां दोन लक्ष त्र्याण्णव हजार रुपये बँकेत जमा केले. या रकमेच्या व्याजांतील दरमहा आठशें रुपये या मंदिराच्या व्यवस्थेसाठीं खर्च होतात. आजतागायत हीच व्यवस्था चालू आहे. राममंदिरांतील नित्यक्रम, गडावर भरणाऱ्या यात्रा आणि होणारे उत्सव यासंबंधींची माहिती निराळ्या प्रकरणांत निवेदिली आहे.

रामरायाच्या दर्शनानें नेत्रांचें पारणें फिटतें. ओठ चरण गुणगुणतात :

भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजन जनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ।
रघुपति मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कांस तूझी धरावी ।।

## राम झरोका

रामाच्या देवळाला प्रदक्षिणा घालतांना आपण पश्चिमेकडे आलों कीं लक्ष्मीनारायणाचें (सत्यनारायणाचें मंदिर) दिसतें. याच्यावरील स्थानास राम झरोका असें नांव आहे. या सज्जांतून आसमंतांतील भूप्रदेश आणि रामटेकमधील सर्व महत्त्वाच्या स्थळांचें विहंगमावलोकन करतां येतें. राम झरोक्यांतून दिसणारीं दृश्यें स्मृतिपटलावर चिरकाल टिकणारीं आहेत. येथें सतत सोसाटयाचा वारा सुरू असतो. राम झरोक्याशेजारींच धर्मेश्वर, मुक्तीश्वर, दशरथ, लवकुश, महादेव, कौसल्या, महिषासुरमर्दिनी इत्यादींचीं मंदिरें आहेत.

## सीतेची न्हाणी

लक्ष्मणाच्या देवळाच्या दक्षिणेस एक कुंड आहे. तेथें जाण्यास पायऱ्या उतराव्या लागतात. हें कुंड सीतेची न्हाणी या नांवानें प्रसिद्ध आहे. स्थानपोथींत वर्णन असें आहे : ‘ रामाचें देऊळ पूर्वाभिमुख : रामांचेया देउळा पुढें लक्ष्मनाचे देउळ पूर्वाभिमुख : लक्ष्मीमनाचेया देउळा दक्षीनें न्हाणि : न्हानिये उत्तरे आसन : न्हाणि सीतेची. ’

## ‘मेघदूता’चें जन्मस्थान

महाकवि कालिदास या भागांत आला असतां येथील सृष्टिसौंदर्य आणि मेघांचें वैचित्र्य पाहून त्याला ‘ मेघदूत ’ हें पुढें अमर ठरलेलें महाकाव्य रचण्याची प्रेरणा झाली असें म्हणतात. कालिदासानें मेघदूतांतील यक्षाच्या निवासस्थानाकरितां रामगिरी हें ठिकाण पसंत केलें. डॉ. मिराशी म्हणतात : ‘ त्या काळीं वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें फार

मोठें प्रस्थ होतें. द्वितीय चंद्रगुप्त विक्रमादित्यानें आपली मुलगी प्रभावती गुप्त हिच्या मदतीकरितां आपल्या दरबारचे कांहीं अनुभव मुत्सद्दी पाठविले होते. त्यांचेबरोबर कालिदासहि विदर्भांत आला असावा. द्वितीय प्रवरसेनाला 'सेतुबंध' हें प्राकृत काव्य रचण्याच्या कार्यांत कालिदासानें मदत केली असावी. त्या कार्यार्थ त्याचा मुक्काम रामटेकजवळ असलेल्या नन्दिवर्धन नामक वाकाटकांच्या राजधानींत झाला असावा. त्या मुक्कामांत तो सृष्टिसौंदर्यानें मोहित होऊन रामगिरीवर वारंवार येत असतां त्याला 'मेघदूता'ची कल्पना सुचली असेल.'

डॉ. मिराशींचें हें विधान अनेकांना मान्य नाहीं. त्यांपैकीं पुण्याचे श्री. वामन कृष्ण परांजपे हे प्रमुख होत. त्यांनीं 'मेघदूतावर नवा प्रकाश' हा ग्रंथ लिहून 'रामगिरि म्हणजे रामटेक नव्हे' हें सिद्ध करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. त्यांच्या मतें मध्यप्रदेशांतील रामगड म्हणजे रामगिरि. श्री. परांजपे यांचीं विधानें खोडून काढण्यासाठीं डॉ. मिराशींनीं 'मेघदूतांतील रामगिरि अर्थात् रामटेक' हें पुस्तक लिहिलें आणि तसें सप्रमाण सिद्ध केलें. तथापि अद्याप हा वाद मिटलेला नाहीं.

रामटेकच्या रामगिरीवर कालिदासाचें स्थान दाखविण्यांत येतें. येथेंच सरकारनें कालिदासाचें स्मारक उभारण्याचा निर्णय घेतला असून हें कार्य कोणत्या प्रकारचें असावें याबद्दल विचार करण्यासाठीं तज्ज्ञांची एक समितीहि नियुक्त केली आहे.

रामगिरीवरील महत्त्वाचीं बहुतेक स्थानें आपण पाहिलीं. त्यांची स्मृति हृदयाशीं बाळगून आतां टेकडीवरून खालीं उतरण्यास हरकत नाहीं. जातांजातां गडाच्या तटबंदीकडे नजर टाकूं या. दक्षिण व पश्चिम बाजूंनीं कडा तुटल्यामुळें नैसर्गिक तटबंदी आहे. उत्तरेच्या व पूर्वेच्या बाजूंनीं मात्र एकांत एक असे दोन तट आहेत. बाहेरचा तट ओबडधोबड, भग्न असून

तो थेट अंबाळ्याचापर्यंत आहे. आंतील तट रघूजी भोसल्यांनीं १८ व्या शतकांत बांधला. तो सध्यां चांगल्या स्थितींत आहे.

आतां आपण मुख्य मार्गानें उतरूं या. चढतांना दम लागला पण उतरणें सोपें आहे. उडचा मारीत ती सोपानपरंपरा आपण चटदिशी पार करून खालीं नगरांत पोहोंचूं आणि विचारूं :

'रामटेकच्या परिसरांत कोणकोणतीं स्थळं आहेत पाहण्यासारखीं ? '

**गडावरील नित्यक्रम, उत्सव आणि यात्रा :**

पहांटे पांच वाजतां नगाऱ्याचा ध्वनि नीरव स्तब्धतेंत नादलहरी निर्माण करतो. गडावरील हा दिनचर्येचा आरंभ असतो. ' सकाळीं उठूनी आधीं वंदावं रामाला । हात लावावा बाई मग दुसऱ्या कामाला ॥ पहाटे उठून रामाचं नांव घ्यावं । धरतीमातेवर मग पाऊल टाकावं ॥ ' या पंक्तींचें स्मरण नगाऱ्याचा ध्वनि भाविकांना करून देतो. सहा वाजतां देवालयाचीं द्वारें उघडण्यांत येतात. सर्वप्रथम सूर्यदेव आपल्या सुवर्णकिरणरूपी पुष्पांनीं श्रीरामाचें पूजन करतो. तदनंतर प्रातःपूजेला सुरुवात होते. प्रातःसंस्कार, स्नान, वस्त्रें बदलणें, आणि यथासांग पूजन हे विधि संपन्न होतात. आरतीला आरंभ होतो–

जयदेव जयदेव जय आत्मारामा
निगमागम शोधितां न कळे गुणसीमा ॥ धृ. ॥
नाना देहीं देव एक विराजे ।
नाना नाटक लीला, सुंदर रूप साजे ॥
नाना तीर्थीं क्षत्रीं अभिनव गती माजे ।
अगाध महिमा पिंड-ब्रह्मांडीं गाजे ॥ १ ॥
बहुरूपी बहुगुणी बहुता काळाचा ।
हरिहर ब्रह्मादिक देव सकळांचा ॥

७१३ee

युगानुयुगीं आत्माराम आमुचा ।
दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥ २ ॥
जयदेव जयदेव जय आत्मारामा
निगमागम शोधितां न कळे गुणसीमा ॥
जयदेव जयदेव–

आरती आटोपल्यावर भागवत, पुराणादि ग्रंथांचें पठन होतें. दहा वाजतां दुसऱ्यांदा नगारा वाजतो. उत्सवदिन असल्यास रुद्राचा अभिषेक करण्यांत येतो. इतर दिवशीं परगांवाहून आलेल्या यजमानांचे इच्छेनुसार पवमानाचा अभिषेक होतो. एव्हांना मध्यान्हाची वेळा होते. आतां नैवेद्य. 'शबरीचीं बोरें उष्टीमाष्टी खाशी । शतजन्मांचा उपाशी । रामराया ।।' ताटवाटी, तांब्या आणि फुलपात्र हें साहित्य चांदीचें आहे. देवानें प्रसाद गोड मानून घेतांच त्याचा लाभ भक्तांनाहि होतो. यानंतर विश्रांती. उन्हाळचांत दुपारीं बारा ते तीनच्या दरम्यान दर्शन बंद असतें.

पक्षी कोटरांत परतण्याची वेळ झाली कीं इकडे मंदिरांतूनहि गलबला सुरू होतो. रात्रीचे सात वाजतां पुन्हां एकदां नगारा वाजतो. सायंपूजेची तयारी होते. पुजारी लगबगीनें तरीहि यथाविधि सर्व कार्यक्रम पार पाडतात. पूजन, भजन आणि कीर्तन यांना रंग चढतो. आठच्या सुमाराला आरती होते. रामाच्या नांवानें ओठ पवित्र होतात. आरतीनंतर शेज. रात्रौ नऊचे नंतर देवदर्शनाला मनाई असते : रात्रौ साडेअकरा वाजतां अखेरचा नगारा वाजतो. दिवसभर श्रम करून झोपी जाणाऱ्या मानवाला ती जणूं सूचना असते 'राम राम म्हण । राम सोन्याची साखळी । वाट मोक्षाची मोकळी । शेवटीच्या वेळीं ।।' नाहींतरी झोप म्हणजे महानिद्रेची संक्षिप्त आवृत्तीच नाहीं का ?

या नित्यक्रमांत वेळप्रसंगानुसार बदल होत असतो. दर शुक्रवारीं दुपारीं बारा वाजतां नगारा खास वाजतो. पूर्वी

शुक्रवारीं आणि एकादशी-द्वादशीला कीर्तन होत असे. विजयादशमी आणि रामनवमी यांच्या नवरात्रांत दररोज अभिषेक होतो. सायंकाळीं कीर्तन आणि रात्रौ भजन होतें. आश्विनी पौर्णिमेपासून प्रतिदिवशीं प्रात:काळीं पांच वाजतां काकड आरती आणि सहा वाजतां मंगल आरती कार्तिक पौर्णिमेपर्यंत होत असते.

प्रतिवार्षिक कार्यक्रमांत रामजन्म, गोकुळअष्टमी, कार्तिकी पौर्णिमा आणि दसरा हे उत्सव प्रमुख होत. उत्सवदिनीं देवाला नवीन वस्त्रें घालण्यांत येतात. या विधीला 'बागा' असें नांव आहे. कार्तिकी पौर्णिमा, वैकुंठचतुर्दशी आणि दसरा या दिवशीं देवस्थान कमेटीमार्फत; वसंतपंचमीला श्री. गटरमल सावजी यांचे तर्फे आणि गोकुळअष्टमीला श्री. भुसाराम माळी यांचेकडून बागा संपन्न होतो.

रामनवमी आणि कार्तिकी पौर्णिमा या दिवशीं मोठचा यात्रा भरतात. यात्रेनिमित्त दरवर्षी ६० ते ८० हजार लोक येथे येऊन जातात. कार्तिकांतील त्रिपुरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर भगवान् शंकरानें त्रिपुरासुराचा वध करून त्याचीं तीन पुरें भस्मसात केलीं अशी कथा आहे. या प्रसंगाच्या स्मृत्यर्थ दरवर्षी त्या पौर्णिमेस रामचंद्राच्या देवळावर शिखराजवळ केलेल्या विशिष्ट स्थानीं पीतांबर जाळण्यांत येतो. इतर दिवशीं गेल्यास सफेदी मारलेल्या भिंतीवर तुपाचे डाग आढळतात. पूर्वी त्रिपुर पाजळीत त्याचा प्रकाश नागपूरला दिसे असें म्हणतात. कवि दास जागेश्वर म्हणतो :

कार्तिक पौर्णिमेचे दिनीं यात्रेची दाटी ।  
दिंड्या घेऊन येते मंडळी त्रिपुर पाहण्यासाठीं ॥  
पंडे लावी त्रिपुर रात्रीं जन टाळ्या पिटी ।  
समस्त करिती जय रामाची गर्जना मोठी ॥

**रामटेकच्या परिसरांत :**

रामगिरि कोंदणांत बसविलेल्या खड्यासारखा आहे. त्याचें माहात्म्य जसें थोर तसेंच त्याच्या पंचक्रोशींतल्या कांहीं स्थळांचेंहि आहे. हीं स्थळें सांस्कृतिक, धार्मिक, व्यावहारिक आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचीं ठरलीं आहेत. त्यांच्या दर्शनाचा लाभ प्रवाशांनीं चुकवतां कामा नये.

**जैनमंदिर**

शहराच्या उत्तरेला एक सुंदर जैनमंदिर आहे. तें आकारानें भव्य असून आंत असलेली जैन तीर्थंकर पार्श्वनाथाची मूर्ति १८ फूट उंचीची आहे. उत्खननांत ही मूर्ति सांपडली असें म्हणतात. मूर्तीच्या बैठकीवर तीर्थंकराचें लांच्छन हरिण कोरलें आहे. ' राम हा आमच्याच पंथांतला होता. त्यानें रामटेकला पहिली भेट दिली त्यावेळीं शांतिनाथाची पूजा केली. त्यावेळेपासून शांतिनाथाची ही मूर्ति अस्तित्वांत आहे ' असें विधान स्थानिक जैन लोक करतात. संपूर्ण जैनक्षेत्र परकोटानें सीमित असून आंत ८–९ मंदिरें आहेत. दर वर्षीं जैन लोकांतील दिगंबरपंथीय येथें रथयात्रा काढतात.


**मनसळ**

रामटेकच्या पश्चिमेला नागपूर–जबलपूर सडकेवर हें फार प्राचीन स्थान आहे. माहिभटांनीं लिहिलेल्या लीळाचरित्र या ग्रंथाच्या एकांकांत या स्थळाचा उल्लेख आहे. ' तेणे म्हणीतले : मनसीळेसि गेले : मग तो ब्राह्मण मनसीळेसि आला: दर्शन जाले : ' मनसळला श्रीचक्रधरस्वामींनीं भेट दिली होती. गांवांत मोठा तलाव असून त्यांत शिगाडे खूप होतात. त्याच्या कांठावर जुन्या काळीं बौद्धांचे स्तूप आणि विहार उभे असावेत, असा पुराण वस्तुसंशोधन खात्याचा कयास आहे. येथें खडकावर प्राचीन लिपींत कोरलेला एक लेख सांपडला असून तो अद्याप वाचला गेला नाहीं. येथील मँगनीजच्या खाणी फार प्रसिद्ध

आहेत. शिंगाडे, विड्याचीं पानें आणि विटा यांची निर्मिती येथें फार मोठ्या प्रमाणांत होते. चैत्र महिन्यांत महानुभाव लोकांची यात्रा भरते.

## श्री क्षेत्र अंबाळें

गडाच्या पूर्वेला गड आणि नारायण टेकडी यांच्या मध्यें अंबाळा नांवाचा मोठा तलाव आहे. त्याला स्वतंत्र तीर्थक्षेत्राचें स्वरूप प्राप्त झालेलें आहे. फार पूर्वी अंब नांवाचा राजा सूर्यवंशांत होऊन गेला. एकदां शिकार करतांना तो या भागांत आला. शिकार करून थकल्यावर त्याला स्नान करण्याची इच्छा झाली. या ठिकाणीं तेव्हां एक डबकेवजा कुंड होतें. त्यांत त्यानें स्नान केलें आणि तहान लागल्यामुळें उदकहि प्राशन केलें. तों काय चमत्कार !... अंब राजाच्या सर्वांगाला असलेला महारोग तात्काळ नाहींसा झाला. राजाला आश्चर्य वाटून त्याच्या मनांत या स्थळाविषयीं अपार श्रद्धा निर्माण झाली. लगेच त्यानें जमीन खणून काढली. तेव्हां त्याला भोगावती नदीचा झरा वाहतांना दिसला. त्यानें तळें बांधण्याच्या कार्यास आरंभ केला. तें पूर्ण झालें तेव्हां लोक त्यास 'अंबाळा तलाव' या नांवानें ओळखूं लागले. या तळ्याचा घाट पहिल्या रघूजी भोसल्यांनीं बांधला. 'देशोदेशींचे लोक



अंबाळा तलाव

या गांवीं आवडीनें येती । अंबकुंड तीर्थाच्या स्नाना पहिले ते जाती । तीर्थविधि करून कितीएक पितरां पिंड देती । स्नान दान करोनि रामाच्या गडावर चढती ॥ ' असें याचें माहात्म्य आहे. रामटेकचे श्री. रामभाऊ गंगाधर जोशी यांनीं लिहून प्रसिद्ध केलेल्या 'सिंदुरागिरी महात्म्य उर्फ रामटेकवर्णन' या पोथींत पार्वतीला शंकरानें अंबाळ्याचें वर्णन असें सांगितलें आहे :

'हे पार्वती, ह्या पर्वतांत अंबकुंड नांवाचें तीर्थ आहे. तें अष्टतीर्थांत विभागण्यांत आलें आहे. त्यांचीं नांवें अनुक्रमें गंगातीर्थ, शंखतीर्थ, अग्नितीर्थ, अंबतीर्थ, वरुणतीर्थ, शुक्लतीर्थ, नृसिंहतीर्थ आणि कुरुक्षेत्रतीर्थ अशीं आहेत. ह्या तीर्थांत स्नान केल्यानें मनुष्य आपल्या सर्व पातकांपासून मुक्त होईल यांत संशय नाहीं. शिवाय जे कोणी आपल्या पितरांची उत्तरक्रिया पिंड-दानादि देऊन येथें करतील त्यांचे पितर उत्तम गतीला पावतील.'

या तलावाच्या भोवताल प्राचीन कलाकुसर असलेलीं देवालयें आहेत. अंबाळ्यांतील नीलवर्ण जलांत दरवर्षी कार्तिकोत्सव, त्रिपुरी पौर्णिमा, रामनवमी, ग्रहण इत्यादि प्रसंगीं हजारों भाविक यात्रेकरू स्नान करून नंतर देवदर्शनास जातात. अंबाळ्याच्या पूर्वेकडील विशाल आमराई आणि मोकळी जागा म्हणजे यात्रा भरण्याचें स्थान होय.

## नागार्जुन

नागार्जुनाची गुहा हें रामटेकच्या परिसरांतील आणखी एक श्रद्धास्थान आहे. रामगिरीपासून सुमारें एक मैलावरील दुसऱ्या टेकडीवर हें स्थळ आहे. टेकडीच्या पायथ्याशीं शामजी नारायण यांनीं उभारलेली सुंदर उद्यानवाटिका आहे. गुहेंत पोंहोंचण्यासाठीं बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. गुहा दुरून पांढऱ्या ठिपक्यासारखी दिसते. कांहीं वर्षांपूर्वी एका मालगुजारानें तिला मंदिराच्या स्वरूपांत आकारित करण्याचा प्रयत्न केला. गुहा लहान असून आंत एक नागाची मूर्ति आणि

मानवाचें दगडी मस्तक-अर्जुन मानावयाचें-एवढ्या वस्तू आहेत-मूर्तीला शेंदूर फासलेला आढळतो.

नागार्जुनाचा जन्म विदर्भांत ब्राह्मणकुळांत झाला. त्याला वयाच्या ७ व्या वर्षी अपमृत्यु येईल, असें भाकित ज्योतिषांनीं केलें. आईवडिलांना दु:ख झालें. प्रसंग टळावा किंवा आपल्या नजरेसमोर तो घडूं नये म्हणून त्यांनीं मुलाला कांहीं विश्वासू व्यक्तींबरोबर रामगिरीवरील अरण्यांत पाठविलें. सुदैवानें ७ वें वर्ष लोटलें तरी बालकाला मृत्यु आला नाहीं. एका बौद्ध भिक्षूचा कृपाप्रसाद त्यास कारणीभूत झाला. त्याच भिक्षूच्या आदेशानुसार तो मगधांत नालंदा येथें गेला. तेथें त्यानें प्रकांड पांडित्य प्राप्त केलें. लवकरच तो नालंदा विद्यापीठाचा प्रमुख झाला. त्याचा शिष्य आर्यदेव यानें तेथें विहार उभारले.

नागार्जुनाला वैद्यक, ज्योतिष, किमया आणि नेत्र-चिकित्सा या शास्त्रांची उत्तम माहिती होती. आयुर्वेदाच्या रसायनक्रियेंत त्यानें बरेंच संशोधन केलें होतें. अमृतरसायन शोधण्यासाठीं त्यानें जिवाचा आटापिटा केला. त्याची कीर्ति चीनपर्यंत पोंहोचली होती. श्री. थॉमस वॅटर्स यांच्या मतें तो ख्रिस्तोत्तर तिसऱ्या शतकांत होऊन गेला असावा.

नागार्जुन आरंभीं ब्राह्मण होता. आपल्या गुहेंत त्यानें अनेक धर्माचरणें केलीं, तपश्चर्या केली. ' शालिवाहन किंवा विक्रमादित्य यांच्याप्रमाणें अद्वितीय पुरुष होण्याचें भाग्य तुला लाभेल ' असा वर त्यानें प्राप्त करून घेतला. नंतर वैदिक धर्म सोडून तो जैन झाला. कालांतरानें त्यानें त्याचाहि त्याग करून बौद्ध धर्म स्वीकारला. बौद्धांच्या महायान पंथांतील माध्यमिक तत्त्वज्ञानाचा प्रस्थापक असा त्याचा गौरव आहे. साहित्य-क्षेत्रांतहि त्यानें मोलाची भर टाकली आहे. तत्त्वचिंतक, कवि आणि थोर लेखक असा त्याचा उल्लेख आढळतो. त्याचे अनेक ग्रंथ आहेत. चौऱ्यायशी सिद्धांपैकीं तो सोळावा आहे. आजहि अदृश्य रूपानें टेकडीवर नागार्जुनाचा वास असून प्रसंगीं तो

औषधोपचारहि करतो अशी रामटेकमधील लोकांची दृढ धारणा आहे. या टेकडीवर दुर्मिळ वनस्पतींचा सांठा आहे असें म्हणतात.

## रामसागर

रामटेक शहरापासून पूर्वेला चार मैल अंतरावर खिडशी (खिन्सी) नांवाचा सुंदर तलाव आहे. सूर आणि कलिया या नद्यांचें पाणी अडवून १९०८ सालीं हा बांध घालण्यांत आला. त्यासाठीं १२ गांवें उठवावीं लागलीं असें म्हणतात. नागार्जुन टेकडी आणि डाक बंगला टेकडी यांच्या मध्यें आणि पूर्वेला पंचाळा गांवाच्या बाजूला कृत्रिम बांध आहे. या खिडशी तलावालाच रामसागर असें दुसरें अन्वर्थक नांव आहे. रामसागराचें क्षेत्रफळ ८२ चौरस मैल आहे असें सांगण्यांत येतें. या तलावामुळें रामटेकला मासेमारीचा धंदा फार भरभराटीस पोहोंचला आहे. प्रत्येकीं २० शेर वजनापर्यंतचे मासे येथें उपलब्ध होतात. कोळी लोकांनीं मासेविक्रीसाठीं आपली सहकारी समितीहि स्थापिली आहे. १९०९ सालीं खिडशी तलावांतून कालवा काढण्यांत आला. ९ फेब्रुवारी १९०९ या दिवशीं या कालव्याचें उद्‌घाटन झालें. त्याचें सर्व पाणी मुख्यतः भंडारा जिल्ह्यास मिळत असून एकूण १६ हजार एकर शेतजमीन त्यायोगें ओली झाली आहे.

रामसागराशेजारीं उंच टेकडीवर निसर्गरम्य स्थळीं एक मनोहर डाकबंगला स्थित आहे. हें ठिकाण म्हणजे अनेक ललित लेखकांचें स्फूर्तिस्थान आहे. गाजलेल्या कादंबऱ्यांतून आपल्याला या डाक बंगल्याचें आणि त्याच्या चहूंकडील निसर्गाचें नितांत रम्य वर्णन वाचावयास मिळालेलें आहे. डाक बंगल्याला अद्याप प्यावयाच्या पाण्याची सोय नाहीं. दगडी पायऱ्या उतरून खालीं रामसागराच्या तटाकीं गेलें कीं दादर-चौपाटीची अभावितपणें आठवण होते. विहार-सहली याच स्थळीं भरलेल्या असतात. नौकाविहार आणि जलविहाराची येथें सोय आहे. प्राकृतिक सौंदर्य अनुपम आहे. विदर्भांतील ज्या लोकांनीं समुद्र पाहिला नाहीं त्यांनीं रामसागराचें दर्शन घेतलें

तरी त्यांना सागरदर्शनाची कल्पना येऊं शकेल. रामसागर बराच खोलहि आहे. जुन्या मध्यप्रदेशांत हा तलाव क्षेत्रफळाच्या दृष्टीनें पहिल्या क्रमांकाचा होता.

## गायखुरी

अंबाळा ते रामसागर या जुन्या मार्गावर हें स्थान आहे. याचें जुनें नांव पितृतीर्थ. पूर्वी हें रामगया या नांवानेंहि ओळखलें जात असे. येथें खडकावर उमटलेल्या श्रीरामप्रभूच्या पादुका आहेत. त्या गाईच्या खुराप्रमाणें दिसतात म्हणून या तीर्थाचें नांव लोकांनीं गायखुरी पाडलें. येथें पितरांना पिंडदान करतात.

## नन्दिवर्धन

नन्दिवर्धन ही वाकाटकांची आरंभींची राजधानी होती. हिचें आजचें नांव नगरधन. हें गांव रामटेकच्या दक्षिण दिशेला ३ ते ४ मैल अंतरावर वसलें आहे. प्रदेश सपाट आहे. आजहि येथें प्राचीन किल्ल्याच्या परकोटाच्या भिंतींचे भग्नावशेष साधारण स्थितींत आहेत. नन्दिवर्धनाचा उल्लेख अनेक ताम्र-पटांतून आलेला आहे. बस्तर जिल्ह्यांत राज्य करणाऱ्या नलवंशी भवदत्तशर्मा नामक राजानें वाकाटक-काळींच विदर्भाचा कांहीं भाग जिंकून नन्दिवर्धन येथें आपली राजधानी वसविली होती. प्राचीन काळीं हें अत्यंत प्रसिद्ध शहर होतें. वाकाटकांशिवाय नल आणि राष्ट्रकूट या वंशांतील राजांची राजधानी होण्याचें भाग्य त्यास लाभलें होतें. इंग्रजी अमदानींत रामटेकला महत्त्व येऊन तें तहसिलीचें ठिकाण होईपर्यंत नन्दिवर्धनाचीच चलती होती. येथील किल्ला आणि इतर प्राचीन अवशेष पाहिले कीं नगराच्या पुरातन वैभवाची साक्ष पटते. उत्खनन करतांना येथें सांपडलेल्या विटा मोठ्या आकाराच्या आहेत. येथें कोटेश्वर महादेवाचें हेमाडपंती पद्धतीचें देऊळ आहे. देवळाजवळ शंखतीर्थ उर्फ शुक्लतीर्थ नांवाचें तळें आहे.

कोटेश्वराच्या देवालयांतील महादेवाच्या पिंडीला खोल भेग पडलेली आहे. तिच्याविषयीं नागपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटीयर, पृष्ठ ३०७ वर एक आख्यायिका छापलेली आहे; तिचा सारांश असा :

'फार पूर्वीं नन्दिवर्धन येथें एक भाविक गवळण रहात होती. ती कोटेश्वराची मनोभावें भक्ति करीत असे. दुधाचा रतीब घरोघरीं घालण्यापूर्वीं रोज ती देवाला त्याचा नैवेद्य दाखवी. भोळे शंकर तिच्यावर प्रसन्न झाले. गवळणीची दूध-विक्री वाढीला लागून तिची दैनिक मिळकत फुगूं लागली. तिच्या पतीला याचें कारण कळेना. त्याला पत्नीच्या पातिव्रत्याचा संशय आला. पाळत ठेऊन एक दिवस तो तिच्या मागोमाग देवळांत आला. त्याच्या संतापाची गवळणीला भीति वाटली. तिनें शिवाची प्रार्थना केली. पिंडी दुभंगली. गवळणीनें आंत उडी घेतली. लिंग पूर्णपणें सांधलें गेलें नाहीं. पतीला क्रोध येऊन त्यानें हातांतील शस्त्र शिवलिंगावर चालविलें. त्यामुळें भेग कायमची झाली.'

नन्दिवर्धन किंवा नगरधनला नन्दरधन असेंहि नांव आहे.

## चाकोरडें तळें

हा तलाव रामगिरीच्या दक्षिणेला एका मैलावर आहे. याचें पूर्वींचें नांव चक्रतीर्थ किंवा चक्रालय असें होतें. येथें श्रीहरीनें सुदर्शनचक्र ठेवलें होतें असें म्हणतात. या तीर्थांतील कमलपुष्पांना विशेष प्रकारचीं पानें असतात. या तलावाच्या तीरावर चक्रेश शिवाचें स्थान आहे. 'सिंदुरागिरी महात्म्यां'त याची थोरवी अशी गायिली आहे : 'जे कोणी या तीर्थांत स्नान करून, चक्रेशाचें दर्शन घेऊन सुदर्शनचक्राच्या संतुष्टीसाठीं ब्राह्मणभोजन घालतील त्यांना त्यांच्या शत्रूंपासून पीडा होणार नाहीं. त्यांच्या शत्रूंचा नाश होईल.' लक्ष्मणाचे देवळांतील शिलालेखांत याचा उल्लेख आहे.

## अश्वमेधतीर्थ

नंदिवर्धनास पूर्वी नंदी नामक राजा राज्य करीत होता. मृगयेच्या निमित्तानें भटकत असतां एकदां तो तपोगिरीजवळ आला. तेथें त्याला अलौकिक असा एक अश्व दृष्टीस पडला. त्यानें तो धरला. इतक्यांत अश्वाचे रक्षक तेथें आले आणि त्याची मागणी करूं लागले. नंदी राजानें अवाक्षरहि न बोलतां मुकाट्यानें अश्व आपल्या नगरीस नेला. सुरक्षित स्थळीं कडक पहाऱ्यांत अश्वास बांधून ठेविलें. आणखी कांहीं काळ लोटला. अश्वावर हक्क सांगणारे कोणीहि आले नाहींत. तेव्हा नंदी राजानें त्यास पृथ्वीवर सर्वत्र फिरवून अश्वमेध यज्ञ केला. यज्ञ पूर्ण झाल्यावर त्याच स्थळीं तपश्चर्या करून राजा नंदी अंतीं ब्रह्मलोकास गेला.

नंदी राजानें जेथें अश्वमेध यज्ञ केला तें स्थळ म्हणजे अश्वमेधतीर्थ. त्याचा यूप व विहीर जवळ दिसतात. सध्यां याचें नांव राखी तळें असून तें रामटेकहून नंदिवर्धनास जाण्याच्या वाटेवर लागतें. लक्ष्मणाचे देवळांतील शिलालेखांत याचा उल्लेख ‘ वाजिमेधं ’ असा आहे.

## कपूरबावली

कपूरबावली उर्फ कर्पूरतीर्थ उत्तरेस गडाच्या खालीं जैन मंदिराहून घंटेश्वराला जाणाऱ्या मार्गावर आहे. महानुभावांच्या स्थानपोथींत या बावलीचा उल्लेख ‘ कापूरवावी ’ असा झाला आहे. कपूरबावलीजवळ बरीचशीं हेमाडपंती देवालयें आहेत. पण तीं कोणत्या देवतांचीं होतीं तें आतां कळण्यास मार्ग नाहीं; कारण बहुतेक मोडकळीस आलेलीं आहेत. या स्थळाला निसर्गाचा वरदहस्त लाभला आहे. वातावरण चित्तवृत्ति उल्हसित करणारें आहे.

उपरिनिर्दिष्ट स्थळांशिवाय आणखीहि कित्येक स्थळांनीं रामटेकचा परिसर भूषविला आहे.

रामटेक आणि त्याच्या परिसराचें दर्शन चित्ताला जेवढें आल्हाद देणारें आहे तेवढेंच तें मति कुंठित करणारें आहे. मॅक्समुल्लरच्या मतें वराह म्हणजे सजल कृष्णवर्ण मेघ. या वराहाची मूर्ति गडावर आहे. कालिदासानें रामगिरीवर 'मेघदूत' रचलें अशी धारणा आहे. टेकडीवर बहुतेक अवतारांच्या मूर्ति आहेत. राम, लक्ष्मण, कौसल्या, लवकुश, दशरथ-वसिष्ठ, मारुती इत्यादींचीं देवळें आहेत. रामसीतेच्या मंदिरापुढें लक्ष्मणाचें देऊळ आहे. जणूं रामसीता पर्णकुटींत विश्राम घेत असून लक्ष्मण द्वाराशीं रक्षणार्थ बसला आहे. जापाळेश्वराच्या मंदिराजवळ श्रवणाचा वध घडला अशी दंतकथा आहे. नन्दिवर्धनाच्या कोटेश्वर मंदिरांत घडलेल्या गवळणीच्या गोष्टीचें सीतामाईच्या अंतकाळाशीं साम्य आहे. या सगळ्या गोष्टींचा अन्योन्य कांहीं संबंध नसेल कदाचित; पण एकत्वेंकरून त्या विचारांत घेतल्या तर रामटेकांत अजूनहि कांहींतरी अनाकलनीय गूढता असल्यासारखी वाटते. ती कोठें आणि कशांत असेल याचा सुगावा साध्या मानवी मनाला लागत नाहीं. प्रभु रामचंद्राचीच अतर्क्य लीला ही ! · · · अखेर त्याच्या ठायीं चित्त लीन होतें :

**उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं**
**रामा सकळजनविरामीं रामविश्रामधामीं ।**
**घडिघडि मन आतां रामरूपीं भरावें**
**रविकुळटिळकारें आपुलेसें करावें ॥ —समर्थ रामदास**

ग्रंथ
दा. क्र. ११३ee

* * * *

---

* या पुस्तकांतील छायाचित्रें सेन्ट्रल म्युझियम–नागपूरच्या सौजन्यानें प्राप्त.

× संदर्भ ग्रंथ सूचि :

१ मेघदूतांतील रामगिरी अर्थात् रामटेक : डॉ. वा. वि. मिराशी.
२ तीर्थरूप महाराष्ट्र ( भाग दुसरा ) : पं. महादेवशास्त्री जोशी.
३ Nagpur–Past and Present—1946.
४ सिंदुरागिरी महात्म्य–रामटेक वर्णन : श्री. रा. गं. जोशी.
आणि अन्य अनेक फुटकळ लेख, पुस्तिका, नकाशे इत्यादि.

REFBK 0011399

REFBK-0011399



वोरा ॲण्ड कंपनी पब्लि.प्रा.लि.
मुंबई.